मायबोली मेळावा वृत्त

वर्ष पाचवे / वृत्त १ २० जानेवारी २०१३

संपर्क: newsletter@mmtbusa.org

नमस्कार मंडळी,

मायबोलीच्या सर्व कुटूंबियांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! २०१३ चे वर्ष आपल्याला आणि आपल्या प्रियजनांना अत्यंत सुखाचे, समृद्धीचे आणि समाधानाचे जावो ही शुभकामना!

ऋतूमानांनुसार निसर्गात घडून येणाऱ्या बदलांचे स्वागत करण्यासाठी आपण नेहमीच उत्सुक असतो. आणि असे स्वागत करायला जर सणाचे निमित्त मिळाले तर मग काय, सोन्याहूनही पिवळे! नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच, ऐन हिवाळ्यात येणारा आपला लाडका 'संक्रांत' सण गुलाबी थंडीची एक वेगळीच मजा घेवून आला आहे. सणाच्या निमित्ताने मग समारंभही ओघाने आलाच . मायबोली मेळावा २०१३ची नवीन कार्यकारिणी अशाच एका धमाल समारंभाने नवीन वर्षाची सुरुवात करते आहे.

नवीन वर्ष, नवीन कार्यकारिणी, नवीन चेहरे, नवीन कल्पना आणि नवीन संयोजन, पण आपल्यातील अनुबंध मात्र जुनेच. हे अनुबंध अजून दृढ करण्याचे प्रयत्न आम्ही इथून पुढेही सतत करणार आहोत. अर्थातच आपल्या सर्वांच्या प्रेम, सहकार्य, आणि प्रोत्साहनाच्या पाठबळानेच ते शक्य होणार आहे.

मायबोलीच्या आजपर्यंतच्या कार्यकारिणींची यशस्वी परंपरा अशीच पुढे चालू ठेवण्यासाठी या वर्षी वैविध्यपूर्ण कार्यक्रमांबरोबरच काही अभिनव प्रयोग करण्याचाही आमचा विचार आहे. ते यशस्वी होण्यासाठी आपल्या सहकार्याबरोबरच नवीन सदस्यांचा मंडळात समावेश व युवा पिढीचा जास्तीतजास्त सहभाग याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर तुमच्या सूचना, अपेक्षा, आवडीनिवडी हेसुद्धा तितकेच महत्वाचे आहे. हे आपले सर्वांचे मंडळ आहे आणि सर्वांनी मिळूनच चालवायचे आहे

पूर्वकार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी 'संक्रमण काळा'त नवीन कार्यकारिणीला भरभरून सहकार्य दिले आणि अजूनही देत आहेत त्याबद्दल नवीन कार्यकारिणीतर्फे त्या सर्वांचे मनापासून आभार!

मकर संक्रांतीनिमित्त गुजराथ राज्यात पतंग उडविण्याचा प्रघात आहे. पतंग आकाशात जितके उंच जातील तितके ते सूर्याच्या जवळ जावून आपली पूजा, प्रार्थना देवापर्यंत पोहोचवतील असा त्यामागील समज आहे. अनेकविध रंगछटांनी सजलेला आपला मायबोलीचा पतंगही लवकरच उंच भरारी घेऊन अवघ्या आसमंतात लक्षवेधी ठरेल यासाठी प्रयत्न करूया.

असाच लोभ कायम ठेवा ही विनंती!

मेधा फडणीस

मायबोली मेळावा कार्यकारिणी

२०१३-२०१४

डावीकडून ड़ॉ. राहुल म्हसकर, श्री. समीर खानविलकर, सौ. प्रियांका वळामे, सौ. उत्तरा तांडेल, सौ. वृषाली पेंढारकर, सौ. नयना वाबळे, सौ. मेधा फडणीस, सौ. वृषाली पेडणेकर, श्री. मायकेल ड़ॅनिअल्स

मायबोली मेळावा कार्यकारिणी

२०१३-२०१४

अध्यक्ष
सौ. वृषाली पेंढारकर

उपाध्यक्ष
डॉ. राहुल म्हसकर

सचिव
श्री. मायकेल डॅनिअल्स

उपसचिव
सौ. नयना वाबळे

कोषाध्यक्ष
श्री. समीर खानविलकर

उपकोषाध्यक्ष
सौ. उत्तरा तांडेल

सांस्कृतिक कार्यक्रम
सौ. मेधा फडणीस
सौ. नयना वाबळे

भोजन व्यवस्था
सौ. वृषाली पेडणेकर
सौ. प्रियांका वळामे

मायबोली मेळावा वृत्त

संपादकः
मेधा फडणीस

सहसंपादकः
नयना वाबळे

मांडणी सजावटः
नूतन कुलकर्णी
मंजुषा नाईक

प्रकाशकः
MMTB Inc

तिळगूळ घ्या... गोड गोड बोला.

जानेवारी महिना सुरु झाला की कडक असणारी थंडी गुलाबी होऊ लागते व बाजारात भरपूर फळ भाज्या, गव्हाच्या लोंब्या, हरभरा, ऊस दिसू लागतात आणि संक्रांत सणाची चाहूल लागते.

मकर संक्रांत हा सण मराठी पौष महिन्यात व इंग्रजी १४ किंवा क्वचित १५ जानेवारीस येतो . मराठी पंचांग हे सूर्योदय व सूर्यास्त ह्यावर आधरित असून एका वर्षात सूर्य बारा राशीतून जातो असे मानले आहे. १४ जानेवारीस तो धनू राशीतून मकर राशीत संक्रमण करतो म्हणून ती 'मकर संक्रांत'. तसेच सूर्याचे दक्षिणायन व उत्तरायण असेही संक्रमण असल्याने ह्या दिवसास 'उत्तरायणारंभ' असेही म्हणतात.

संपूर्ण जगातच सूर्यामूळे जीवन असल्याने ह्या दिवशी आपल्याकडे स्त्रिया सूर्याची पूजा करतात.

हा सण आशियातील बहूतांशी देशात व भारतातील सतरा राज्यांत साजरा होतो. त्याचे स्वरूप विविधतेने नटलेले असून उत्तर भारतात 'बैसाखी', दक्षिणेत तामिळनाडू येथे 'पोंगल', व महाराष्ट्रात 'संक्रांत' अशी त्याची नावे आहेत. पूर्वभारतात गंगासागर येथे यात्रा होते तर गुजरातमध्ये पतंग उडवून हा सण साजरा करण्याची प्रथा आहे.

बहूतेक ठिकाणी, विशेषतः महाराष्ट्रात हा सण तीन दिवस साजरा होतो.

पहिला दिवस- ह्याला 'भोगी' असे म्हणतात. ह्या दिवशी सुगंधी तेलाने स्नान करून जेवणात मुगाच्या डाळीची खिचडी, वांग्याचे भरीत, गाजर आणि वालाच्या शेंगा यांची लेकुरवाळी भाजी, ताकातील भाजी, तीळ घालून बाजरीची भाकरी, व त्यावर ताजे लोणी असा फक्कड बेत असतो. ह्या दिवशी माहेरवाशिणीला जेवायला बोलावतात.

दुसरा दिवस- सणाचा दिवस. सवाष्ण स्त्रिया पाच सुगडं (काळी, माठाच्या आकाराची छोटी मातीची भांडी) आणून त्यात गव्हाच्या लोंब्या, हरभऱ्याचे घाटे, मुगाची डाळ व तांदूळ, बोरे, गाजराचे तुकडे, उसाचे करवे घालतात. त्या सुगाडांना वरून ओल्या बोटांनी हळद कुंकवाची रेघ ओढून, सूताचा धागा बांधून, तिळगुळाचा नैवेद्य दाखवून सूर्याची पूजा करतात व पाच स्त्रियांना ही पाच वाणे देतात. नवीन लग्न झालेल्या स्त्रियांनी पहिली पाच वर्ष ह्याच गोष्टी पाटावर ठेवून पाच वाटे करून वाण देण्याची प्रथा आहे. पहिल्या वर्षी सासरी नवीन सुनेसाठी हलव्याचे दागिने करुन जावयाला हार, गुच्छ, नारळ व चांदीच्या वाटीत तिळगूळ घालून देतात. या समारंभाला 'तिळवण' असे म्हणतात. तीळ व गूळ हे स्निग्ध आणि गोड असल्याने मोठ्यांनी लहानांना 'तिळगूळ घ्या, गोड बोला' असे म्हणण्याचा प्रघात आहे. पूर्वीच्या काळी नातेवाईकांना पोस्टानेसुद्धा तिळगूळ पाठविण्याची प्रथा होती. ह्या दिवशी नैवेद्य म्हणून गुळाची पोळी व बोरव्याची खीर (गव्हले) हे जेवणात करतात.

तिसरा दिवस- याला 'कर' म्हणतात. ह्या दिवशी तांदूळाच्या पिठाची धिरडी व गुळवण (गुळाचे पाणी) असे जेवण असते.

संक्रांत सणाला नवीन लहान बाळासाठी 'बोर- नहाणाचा' समारंभ करतात. लहान मुलांना आवडणारे चुरमूरे, बोरे, ऊसाचे करवे, गाजराचे तुकडे, हरभऱ्याचे घाटे, तिळगूळ इत्यादी बाळाच्या डोक्यावरुन घालून इतर लहान मुलांना ते वेचावयास सांगतात. मुलांच्या पहिल्या पाच वर्षांपर्यंत हा समारंभ करतात.

हा सण पौष महिन्याच्या कोणत्याही तिथीस पण १४ जानेवारीला येतो व रथसप्तमीस याची समाप्ती होते. त्या दिवशी एका छोट्या सुगडात दूध घालून मध्यान्हीला सूर्याच्या उन्हाने ते उतू जावू देतात व पूजा करून त्याची सांगता करतात.

स्त्रियांना पूर्वीपासून घराबाहेर जाण्यासाठी खूप बंधने असत. पुढे शिक्षणामूळे यात बदल झाला व त्या चंद्रावरही जावू लागल्या. पण त्या काळी हळदीकुंकू करून एकमेकांच्या घरी जाणे मान्य होते. म्हणून ह्याही सणास हळदीकुंकू करतात व इतर स्त्रियांना वस्तूंची देवाण घेवाण करतात. यालाच 'लूटणे' असे म्हणतात. या निमित्ताने सुंदर वस्त्रे परिधान करणे, सुंदर आभूषणे घालणे, एकमेकींची सुखदुःखे वाटणे ही हौस करता येते. खरंच आपल्याकडे सण आणि हळदीकुंकू या सारख्या किती छान प्रथा आहेत नाही का?

सौ. आशा देशपांडे

रंगुनी रंगात साऱ्या, रंग माझा वेगळा—मायबोली मेळावा दिवाळी २०१२

२०१३ 'अभिरुची' अंकासाठी आवाहनः

प्रिय लेखक मित्र/मैत्रिणींनो,

अभिरुचीच्या आगामी अंकासाठी आपल्या प्रत्येकाच्या जीवनात होत जाणाऱ्या बदलांचं, संघर्षांचं, आणि त्या अनुभवांचं चित्रण असलेले साहित्य म्हणजे कथा, लेख, प्रवासवर्णन, कविता, विनोदी साहित्य, कादंबरी, व्यंगचित्र इ. मागवीत आहोत.

शब्दमर्यादा १५०० शब्द.

या अंकासाठी साहित्य **१५ फेब्रुवारी २०१३** पर्यंत पाठवावे. साहित्य हस्तलिखीत अथवा टाईप केलेले चालेल.

मुखपृष्ठासाठी-चित्र/फोटोग्राफ पाठवावे. स्वतः काढलेल्या चित्रांना प्राधान्य दिले जाईल.

बालवाचकांनी उत्साहाने सहभागी होवून बालविभाग समृध्द करावा ही अपेक्षा आहे.

पत्र व्यवहाराचा पत्ताः

Manjusha Naik
7317 Colonial Lake Drive
Riverview, FL 33578
Email: manjushaotr@yahoo.com or desind2000@verizon.net

बृहन्महाराष्ट्र मंडळ १६ वे अधिवेशन !!

Providence, Rhode Island July 5-7, 2013

नावनोंदणीला सुरुवात झाली आहे. अधिक माहितीसाठी कृपया

bmm2013.org या संकेत स्थळाला भेट दयावी.